ब्रिटिश सरकार अडचणीत

स्वातंत्र्यसेनानी, प्रभाकर देशमुख

ब्रिटिश सरकार दुसऱ्या महायुद्धाच्या भीषण छायेखाली होते. भारतालाही महायुद्धाच्या झळा पोहचू लागल्या होत्या, एकीकडे युद्धाचे आव्हान व दुसरीकडे गांधीजींचा शांततामय असहकार सत्याग्रह या कात्रीत ब्रिटिश सरकार सापडले होते. गांधीजींना सर्व संभाव्य परिणामांची जाणीव असल्यामुळे त्यांनी पुढचे पाऊल अतिशय सावधानतेने टाकावयाचे ठरले. सामुदायिक आंदोलनाशिवाय नागरिकांनी मर्यादित स्वरुपाचा वैयक्तिक सत्याग्रह करावा अशी रणनीती आखली. यासाठी ज्यांनी स्वातंत्र्यलढयात स्वतःला संपूर्णपणे झोकून दिले आहे व ज्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय कणखर आहे अशा सैनिकांची निवड करण्यात सुरुवात झाली. पहिले सत्याग्रही होण्याचा मान **आचार्य विनोबा भावेंना** मिळाला.

तळे येथे जिल्ह्यतर्फे वैयक्तिक सत्याग्रह

तळे विभागांतील तळेगांव या ग्रामीण भागातील चर्मकार समाजांतील दगडू मालु हा तरुण १९३५ पासून राष्ट्रीय काँग्रेसचा प्रचारक होता. कुलाबा जिल्ह्यातर्फे तळे येथील दगडु मालु चांभार यांना वैयक्तिक सत्याग्रह करण्याची घोषणा जिल्हा काँग्रेसने केली. त्यांनी ६ जानेवारी १९४० रोजी तळे येथील लक्ष्मी-नारायण देवळाच्या पटांगणात सत्याग्रह आयोजित केला. तेथे तळेगांव या त्यांच्या गावाहून येणार असल्यामुळे जागोजागी पोलीस त्यांना पकडावयास ठेवले होते. सत्याग्रह अयशस्वी झाला हे पोलीसांना दाखवायचे होते आणि यांना सत्याग्रह प्रत्यक्ष ठरवलेल्या जागेवर करायचा होता. लक्ष्मी-नारायण देवळासमोर विनायक पिसाट यांचे घर होते. तेथे त्यांची गुचपूपपणे व्यवस्था सकाळपासून केली. पिसाट अस्पृश्यता मानत नव्हते. त्यांनी त्याची सकाळपासूनच व्यवस्था केली कारण सत्याग्रहीला पकडणार हे निश्चित असल्यामुळे

जेवणाचीही सोय केली होती. जिल्ह्यातर्फे महाडवरुन काळू भाऊ धारिया व कर्जतहून भाऊसाहेब राऊत आले होते. रत्नागिरी जिल्ह्यासाठी श्री. महम्मद अब्दुल्ला परकार यांची वैयक्तिक सत्याग्रहासाठी नेमणूक केली. या दोघांनाही दीड वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा झाली.

काँग्रेसच्या झेंडयाखाली, गांधींजींनी सत्याग्रहाला देशव्यापी स्वरुप दिल्यामुळे स्वातंत्र्याचा विचार देशाच्या कानाकोपऱ्यांत पोहोचल्यानंतर स्वातंत्र्यलढयाची तीव्रता वाढली. जे लढयात प्रत्यक्षपणे सहभागी झाले नाहीत अशांवरही गांधीजींच्या नैतिक शिकवणीचा प्रभाव पडला. आंदोलनातील भूमिगत-चळवळीतील लोकांनी ब्रिटिशांना राज्य करण्यास नामोहरम करावयाचे होते म्हणून त्यांनी कर्जत भागात मुंबईकडे जाणारी वीज व टेलिफोनच्या वायरी कापल्या. ही गांधीजी मार्गापेक्षा वेगळया मार्गाने चालवण्यात आली. संपूर्ण हिंदुस्थान, ब्रिटिशांच्या विरोधात आंदोलनात उतरला. त्याचे पडसाद मुंबईबरोबरच कोकणात उमटले. मिरवणुका हरताळ, मोर्चे यामुळे जनजीवन ठप्प झाले. याच सुमारास दुसरे जागतिक युद्ध शिगेला पोहोचल्यावर युरोप व बहुतेक आघाडयांवर ब्रिटिश सैन्य पराभूत होत होते. अशा ऐनवेळी स्वातंत्र्यासाठी उभा ठाकलेला हिंदुस्थानातला संघर्षामुळे ब्रिटिश सरकार जेरीस आले. स्टॅफोर्ड क्रिप्स यांची शिष्टाई व्यर्थ गेली. भारताला पूर्ण स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे ही गांधीजींची भूमिका होती. तिचा पुनरुच्चार १४ जुलै १९४२ रोजी वर्धा येथील काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत करण्यात आला. ब्रिटिशांच्या विरोधात दूरगामी संघर्ष द्यावा लागेल, याची सर्वांना कल्पना आली होती. याबद्दलचा निर्णय मुंबईत ऑगस्ट महिन्यात घेण्यात यावा असे ठरले.

छोडो भारत

सामुदायिक सत्याग्रहाप्रमाणे वैयक्तिक सत्याग्रहानेसुद्धा इंग्रज अतिशय जेरीला आले होते. वैयक्तिक सत्याग्रहामुळे अहिंसात्मक लढयाला प्रचंड पाठबळ लाभल्यामुळेच १९४२ ची 'भारत छोडो' चळवळ अधिक परिणामकारक होऊ शकली. मिठाच्या सत्याग्रहाने व सविनय कायदेभंगाच्या चळवळीने देशाच्या राजकीय भवितव्याला कलाटणी दिली. जनतेच्या अहिंसक प्रतिकारामुळे सरकारला दडपशाही, धरपकड, राजकीय बंद्यांचा छळ, घरावर जप्ती या मार्गाशिवाय काही सुचत नव्हते. प्रभातफेऱ्या, मिरवणुका,

निषेध मोर्चे, जाहीर सभा यांनी पोलिसयंत्रणा हतबल झाली. सरकारवर उघड टीका करणे राजद्रोह समजला जात असल्यामुळे ब्रिटिशांविरूद्ध प्रक्षोभक मजकूर असलेली गुप्तपत्रके, बुलेटिन्स रात्री अज्ञात ठिकाणी छापून आणत आणि त्याचे वितरण करणे हे अतिशय साहसाचे समजले जात असे.

या काळात जनजागृतीचे मोठेच काम सेवादल स्वयंसेवकांच्या मेळयांनी केले होते. कवी, संगीतकार, लेखक, दिग्दर्शक, कलाकार त्यातूनच निर्माण होत. एकांकिकातून विविध विषय हाताळले जात. धूम्रपानाचे दुष्परिणाम व दारुनी होणारी संसाराची वाताहत परिणामकारक रीतीने सादर केली जाई.

भारताला वसाहतीचा दर्जा देण्याची योजना, सर स्टॅफर्ड क्रिप्स याने अखिल भारतीय काँग्रेस समोर मांडली. ती फेटाळण्यासाठी ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर अधिवेशन आयोजित करण्याचे ठरले. त्यावेळी महात्मा गांधी, पंडित नेहरू, सरदार पटेल इत्यादी प्रमुख मंडळी हजर होती.

गोवालिया टँक

महात्मा गांधीनी सर स्टॅफर्ड क्रिप्स योजना फेटाळली आणि ब्रिटिशांना छोडो भारतचा इशारा देताना ८ तारखेच्या सभेत गांधीजींनी अत्यंत समर्पक व स्पष्ट विचार मांडले. प्रचंड जनसमूहाला उद्देशून ते म्हणाले 'तुम्ही सर्वांनी माझ्या हातात देशाच्या भवितव्याचे अधिकार दिलेले आहेत. मी आता व्हाईसरॉय यांच्याशी काँग्रेसच्या मागण्याबद्दल चर्चा करीन. त्यासाठी काही अवधी लागेल पण तुम्ही एक गोष्ट लक्षात ठेवा की त्यांनी मंत्रिमंडळात भारतीयांना स्थान द्यावे अशा वाटाघाटी करणार नाही. आता मला पूर्ण स्वातंत्र्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही पर्यायाने समाधान होणार नाही. माझा आग्रह पूर्ण स्वातंत्र्य, त्याशिवाय अन्य काहीही नाही. मी आज तुम्हाला छोटासा मंत्र देतो. हा मंत्र तुम्ही तुमच्या हृदयात कोरुन ठेवा आणि तुमच्या प्रत्येक श्वासातून तो व्यक्त होऊ द्या. तो मंत्र म्हणजे करेंगे या मरेंगे, भारत छोडो. एक तर हिंदुस्थानाला स्वतंत्र करु किंवा त्या प्रयत्नात प्राणाहुती देऊ पण यापुढे गुलामीचे जीवन पाहण्यास जिवंत राहणार नाही.' गांधीजींनी त्यांनतर उद्‌गारलेला प्रत्येक शब्द उपस्थितांच्या काळजाचा ठाव घेत गेला. गांधीजींच्या करेंगे या मरेंगे या मंत्राचा गवालिया टँकवरील उपस्थित प्रचंड जनसमुदायावर विजेचा

झटका बसावा तसा परिणाम झाला. भारत छोडो चले जाव करेंगे या मरेंगे या घोषाणांनी आसमंत दुमदुमून गेले. सर्व वातावरण भारलेले व केवळ अभूतपूर्व असे होते. प्रत्येक भारतीयांच्या नसानसात हा क्रांतिमंत्र प्रवाहित झाला. सभोवारच्या भारलेल्या वातावरणात गांधीजींनी नव्याने सुरू होणाऱ्या लढयाची कल्पना दिली. जनसामान्यांनी, सरकारी नोकरांनी, पोलीस दल व फौजेतील जवानांनी तसेच संस्थानिकांनी, ब्रिटिश सत्तेशी सर्व थरावर असहकार सुरू करावा, शांततापूर्ण सत्याग्रह करावा व शिक्षक-विद्यार्थ्यांनी शाळा-कॉलेजवर बहिष्कार घालावा. गांधीजींचे भाषण अत्यंत संयमशील व शांततेच्या मार्गाचा पुरस्कार करणारे होते. त्यात आक्रमकता होती पण हिंसेला आवाहन नव्हते.

ब्रिटिश सरकारने गांधीजींच्या व इतर नेत्यांवर सत्तेविरुद्ध बंड पुकारणे व अराजक निर्माण करणे असे आरोप करीत दडपशाहीला सुरुवात केली. याची काँग्रेसला पूर्ण कल्पना असल्यामुळे ८ ऑगस्टला कार्यकारिणीच्या अधिवेशनात महत्त्वाचा ठराव मंजूर करण्यात आला, त्यात आम जनतेला स्पष्ट आवाहन करण्यात आले होते की 'अशीही वेळ येईल की, कार्यकर्त्यांना व जनतेला वेळोवेळी सूचना देणे व मार्गदर्शन करणेही अशक्य होऊन बसेल. असे झाले तर स्वातंत्र्य लढयात भाग घेणारा प्रत्येक पुरूष व स्त्री काँग्रेसने घालून दिलेल्या चौकटीत स्वतःच स्वतःचे नेतृत्व करील. स्वातंत्र्यसैनिकाने अशा परिस्थितीत स्वतःचे मार्गदर्शक व्हावे.'

९ ऑगस्ट १९४२

८ व ९ ऑगस्टला जेष्ठ नेते स्थानबद्ध झाल्यामुळे देशात अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली, जनता नेतृत्त्वहीन झाली, मार्गदर्शन करणारे नेते गजाआड झालेले किंवा भूमिगत झालेले होते. सरकारची दडपशाही पराकोटीला पोहोचली. त्याच्या परिस्थितीत सर्वसाधारण लोकांनी प्रचंड प्रसंगावधान दाखवले व जसे जमेल तसे ब्रिटिशांविरूद्ध आंदोलन छेडले. प्रत्येक जण वैयक्तिक सहभागाने झपाटून उठला. पोलिसांच्या अत्याचारविरूद्ध विद्यार्थी व शिक्षकांनी शाळा-कॉलेजांचा त्याग केला. जागेजागी हरताळ, मोर्चे, सभा व मिरवणुका आयोजित करण्यात आल्या. सबंध भारतात व विशेष करून महाराष्ट्रात एक आगळेवेगळे क्रांतियुद्ध सुरू झाले. त्याचे पडसाद, आजूबाजूच्या परिसरात फार मोठया प्रमाणात उमटले.

सभेनंतर छोडो भारत या व्यापक जन आंदोलनाचा प्रारंभ सुरु झाल्याने सर्वांना बंदिस्त ठेवण्यास तुरुंग कमी पडू लागले. आपल्याला अटक होणार हे वैयक्तिक सत्याग्रही दगडू मालू यांना माहित असल्यामुळे ते दोन आठवडे भूमिगत राहण्यासाठी आपल्या गावी आले. तेथे त्यांना भाताच्या कणगीत लपले असताना पकडले. (जे नंतर राखीव मतदार संघातून निवडून आले आणि आपले नांव दत्तात्रय मालोजी तळेगांवकर असे करुन घेतले.)

घराच्या भिंतीवर, जिथे जागा मिळेल तिथे गेरूने किंवा रंगाने भारत छोडो चले जाव जय-हिन्द महात्मा गांधीकी जय असे फलक रात्री रंगवले जात, सकाळी त्यांच्यावर पोलिसांची दृष्टी पडली की त्याच्यावर चुन्याचा लेप लावला जाई. हे सतत चालू असे. अतिशय तळमळीने काम करणाऱ्या युवा महिला अग्रेसर होत्या. तरुणांना एकत्र आणून राष्ट्रभावनेची ज्योत सतत तेवत ठेवण्याचे कार्य राष्ट्रसेवा दलाने केले. त्यावेळी जिल्ह्याच्या विविध भागात राष्ट्र सेवा दलाच्या शाखा होत्या साने गुरुजी, ना.ग.गोरे, एस.एम.जोशी, अच्युतराव पटवर्धन, यांचे मार्गदर्शन सेवादलाच्या सैनिकांना लाभत असे. या काळाचे वैशिष्टय म्हणजे स्वातंत्र्याच्या, देशप्रेमाच्या भावनेने प्रत्येकजण झपाटलेला होता. चारित्र्य संपन्नता, गांधीजी व राष्ट्रीय नेत्यावरील असीम निष्ठा, त्याग व समर्पणाची जाणीव युवा पिढीच्या ठायी ठायी दिसत होती.

ऑगस्टच्या संघर्षाची सांगता नाविक दलाच्या उठावाने झाली. मुंबईला ब्रिटिशांच्या विरूद्ध नाविक सैनिकांनी आपपल्या बोटीतून अचानक बंड पुकारले. त्याचा परिणाम इंग्लंडवर प्रचंड झाला.

यशवंतराव देशमुखांनी १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला होता. स्वातंत्र्य चळवळीची प्रचंड उर्मी होती परंतु १९४२ च्या आंदोलनात जाणीवपूर्वक लांब राहिले कारण त्याचवर्षी सीडी देशमुखांची भारत सरकारने रिझर्व्ह बँकेचे पहिले गव्हर्नर म्हणून नेमणूक केली होती.

तळे येथिल छोडो भारत आंदोलन

राष्ट्रसेवादलाच्या शाखा गावोगावी उघडत होत्या. तळयाची शाखा खंडू कुलकर्णी चालवत असे. त्या शाखेत गंगाधर पिसाट, अनंत कजबजे, कमलाकर कजबजे, माधव शिर्के, नारायण मेकडे, नाना मुद्राळे, शिलाई काम करणारे मांढरे, विनायक सदाशिव वेदक,

हरी वेदक नियमित हजर असत. त्या तरुणानी, जनजागृतीचे काम मेळयाच्या माध्यमातून केले. कवी, संगीतकार, लेखक, दिग्दर्शक, कलाकार त्यातूनच निर्माण झाले. एकांकिकातून धुम्रपानाचे दुष्परिणाम, दारुने होणारी संसाराची वाताहत परिणामकारक रीतीने सादर केली जाई. या शाखा होळीच्या मैदानावर व लक्ष्मी-नारायण मंदिरासमोरील मैदानात भरत. त्याच मंदिरात व्यायाम शाळाही सुरू करण्यात आली. रोज तरुणांच्या प्रभातफेऱ्या निघत. त्यांना ज्येष्ठ नेते वामन आत्माराम वेदक व जी.टी.पालकर (बांगडीवाले कासार) करीत.

तळे येथे राष्ट्रसेवादलांच्या मुलांनी गांधी, नेहरू यांना अटक झाल्याच्या निषेधार्थ फेरी काढून हरताळ पाळला. कन्याशाळेच्या दिघेबाई या मुख्याध्यापिका व मुलांच्या शाळेतील विश्वनाथ वेदक (पोतदार) या मुख्याध्यापकानी शाळा तात्काळ सोडल्या. प्रभात फेरीत भाग घेणाऱ्या सूर्यकांत पिसाट व त्यांची बहिण प्रभावती (सौ. पुष्पलता अनंत आंबेतकर), शकुंतला वामन वेदक, विमल साठे यांना पकडून नेताना सब-पोस्टमास्तर प्रभाकर रामकृष्ण देशमुख यांनी पोलीसांना विचारलं, या लहान मुलांना का पकडून नेत आहात? या घटनेचा रिपोर्ट पोलीसांनी माणगांव येथे करताना प्रभाकर देशमुख हे पोस्टमास्तरची शासकीय नोकरी करत असूनही या आंदोलनाला प्रोत्साहन देत आहेत असा केला. वरील तरूणांच्या धरपकडीनंतर, तळे येथे हरताळ पाळून गावांतील शाळा सोडून देण्यात आल्या विश्वनाथ पोतदार या हेडमास्तरांना पकडण्यासाठी पोलीस शाळेत गेले. त्यांनी मी सरकारी नोकर आहे तुम्हाला वॉरंट शिवाय शाळेमध्ये प्रवेश करता येणार नसल्याचे सांगितले.

थोडयाच दिवसांत भूमिगत असलेल्या दगडू मालू या चर्मकार समाजातील तरुणाला तळेगांव येथे घरी आल्याचे कळल्यावर छापा टाकून पकडले. वरील सर्वांना दीड वर्षाची सजा झाली.

अटकसत्र तळे परिसरात येऊन तळे येथून जी.टी.पालकर, वामनराव वेदक, यांनाही अटक झाली. राष्ट्रसेवा दलांच्या मुलांनी गांधी, नेहरू यांना व स्थानिक नेत्यांना अटकेच्या निषेधार्थ गावातून फेरी काढून हरताळ पाळला. कन्याशाळेच्या दिघेबाई या राष्ट्रीय वृत्तीच्या मुख्याध्यापिका होत्या त्यांनी मुलींची शाळा तात्काळ सोडली. प्रभात फेरीत भाग घेणाऱ्या

सूर्यकांत पिसाट व त्यांची बहीण प्रभावती, शकुंतला वामन वेदक, विमल साठे यांना पकडून नेताना सब पोस्टमास्तर प्रभाकर रामकृष्ण देशमुख यांनी पोलीसांना विचारलं. 'या लहान मुलांना कां पकडून नेत आहात?' या घटनेचा रिपोर्ट पोलीसांनी माणगांव येथे केल्यावर प्रभाकर देशमुख पोस्ट मास्तर ही सरकारी नोकरी करत असूनही विरोधी प्रचार करत आहेत असा आरोप ठेवला.

माणगांव येथील मामलेदार नाईक राष्ट्रप्रेमी होते. चौकशी केल्यावर त्यांच्या लक्षांत आले की, हरताळ पाडताना प्रभात फेरीतील सेवादलातील कार्यकर्त्यांनी विध्वंसक घोषणा दिलेल्या नाहीत. फक्त भारत माता की जय, इन्कीलाब झिंदाबाद, गांधी नेहरूंचा विजय असो अशा घोषणा दिल्या आहेत. कट कारस्थान रचण्याचा कोणताही सकृत दर्शनी पूरावा न मिळाल्यामुळे तरूणांचे फिंगरप्रिंट्स घेऊन व याच्यापूढे अशी कृत्ये करणार नाही असे लिहून घेवून सोडून दिले. अटक झाल्यानंतर वरील ज्येष्ठ नेत्यांना येरवडा जेलमध्ये दीड वर्षाचा कारावास झाला. प्रभाकर देशमुख यांनी पोस्टमास्तर पदाचा राजीनामा देऊन स्वातंत्र आंदोलनात भाग घेतला. पुष्पलता हिचा जन्म १७ जानेवारी १९२४ मधला, त्यांना तेथे अल्पवयीन ठरवून तुरुंगात न पाठविता ताकीद देऊन सोडण्यात आले. थोडयाच दिवसात त्यांचे लग्न आंबेतकर घराण्यांतील अनंत या ग्रॅज्युएट झालेल्या तरुणाशी झाले.

व्हिक्टोरिया क्रॉस दुसरे महायुध्द

व्हिक्टोरिया क्रॉस हे शौर्य पदक मिळविणारे यशवंत घाडगे हे माणगांव तालुक्यातील पळसगांव येथिल, त्यांचे मोठे भाऊ ब्रिटिश सैन्यात असल्यामुळे तेही सैन्यात सामिल झाले. त्याच गावात प्राथमिक शिक्षण घेत असताना लाठी, दांडपट्टा, कसरत करण्याची आवड निर्माण झाली. ते १९३८ साली ५ व्या मराठा लाईट इंन्फ्रन्टीमध्ये दाखल झाले. लवकरच त्यांची कामगिरी पाहून त्यांना नाईक पदावर बढती केली. त्याचसुमारास दुसरे महायुध्द सुरु झाले. त्यांत एका बाजूला जर्मनी, इटली आणि जपान होते तर दुसऱ्या बाजूला ब्रिटन, फ्रान्स, सोवियत संघ आणि अमेरिका होती. १९३९ ते १९४५ दरम्यान दुसरे महायुध्द झाले. यशवंत घाडगे यांची तुकडी इंग्लंडच्या मित्र राष्ट्रातर्फे इटली आणि जर्मन विरोधात लढत होती. १० जुलै १९४४ रोजी जर्मन छावणी ताब्यात घेण्यासाठी

यशवंत घाडगे यांची तुकडी दाखल झाली. जंगलाचा आधार घेऊन जर्मन सैन्याने अचानक हल्ला केल्यामुळे तुकडीतील बहुतेक सैन्य ठार झाले परंतु यशवंत घाडगे यांनी आपला हातगोळा जर्मन शत्रूवर फेकला. इटलीचे ४ सैनिक ठार झाले परंतु हातबॉम्बचा साठा संपत आल्याचे लक्षात आल्यावर स्वतःच्या बंदुकीच्या दस्त्याने हाणामारी सुरु केली परंतु जर्मन सैनिकांनी त्यांना गोळी झाडून मारले. त्यांचे पार्थिव मिळाले नाही पण या धाडसाची माहिती सर्वदूर पसरल्यामुळे ब्रिटिश शासनाने नाईक यशवंत घाडगे यांना मरणोत्तर व्हिक्टोरिया क्रॉस हा ब्रिटिश सैन्यातील सर्वोत्तम सन्मान दिला. तो व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हल यांच्या हस्ते घाडगे यांची पत्नी लक्ष्मीबाई यांना ३ मार्च १९४५ रोजी प्रदान करण्यात आला. शासनाने माणगांवच्या मामलेदार कचेरीजवळ त्यांचा पुतळा उभारला आहे. दरवर्षी ९ जानेवारीला माणगांव येथे घाडगे महोत्सव साजरा करण्यात येतो. या कामगिरीची इटली सरकारने पण त्याची नोंद ठेवली आहे.

प्राथमिक शिक्षणात इंग्रजी हा विषय होता

१९२० ते १९४४ पर्यंत ५ वी पासून म्हणजे इंग्रजी १ ली पासून इंग्लिश शिक्षण मिळण्याची सोय मराठी दगडी शाळेत होती. जिल्हा स्कूल बोर्ड त्यावर नियंत्रण ठेवे. इंग्रजी ३ री पर्यंत म्हणजे त्यावेळच्या व्हर्नाक्युलर फायनल पर्यंत शिक्षण घेतलेल्या लोकांना इंग्रजीचे चांगले ज्ञान असे. तर्खडकरांच्या ३ भाषांतर पाठमाला, टेक्स्ट बुक्स, रीडर्स अभ्यासक्रमात होती. इंग्रजी व्यतिरिक्त इतर विषयांचे गुण या इंग्रजी निकाल पत्रामध्ये नमूद करीत असत. या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर अन्य माध्यमिक शाळांमध्ये इंग्रजी चवथीच्या वर्गात प्रवेश मिळत असे.

सुप्रसिध्द वाड बुवा यांची कीर्तने तळे येथील पुसाटीच्या विठोबा मंदिरात होत असत. रसाळ कीर्तन हे त्यांचे वैशिष्टय होते. त्यांच्या घराण्यातील ३ पिढया ही परंपरा चालवत आहेत. शिलाहारकालीन गणपती मंदिरात माघी चतूर्थीच्या दिवशी हौशी तरुण ऐतिहासिक नाटके करीत असत. करमणूकीची दुसरी कोणतीही साधनं नसल्यामुळे मोठी गर्दी होत असे. पुसाटीमध्ये पेंडसे यांच्याकडे श्रावण महिन्यात ५ दिवस गुरुमहाराजांचा उत्सव फार उत्साहानं पेंडसे मंडळी पार पाडीत. पुणे मंबईकडील नामांकित कीर्तनकारांची कीर्तनं तेथे होत.

प्लेगची साथ

१९४५ मध्ये प्लेगचे उंदीर मरण्यास सुरूवात झाली त्यावेळी गावांतील लोकं आवसे काढून शेतात रहावयास गेली होती. तळे परिसरांतील ३० नागरिक या प्लेगच्या साथीमध्ये मेले. सप्टेंबर १९४५ मध्ये प्लेग प्रतिबंधक लस उपलब्ध झाल्यामुळे साथ लवकर आटोक्यात आली. दिवाळीच्या सुमारास माणसे परत येऊ लागली. त्याचवेळी पोतदार घराण्यात चर्चा होऊ लागली की, श्रावण महिन्यातील चंडिका मंदिरातील सप्ताह भजन आपण बंद केले आहे त्यामुळे या साथी येत आहेत. त्यांनी पुन्हा श्रावण प्रतिपदा ते सप्तमीपर्यंत भजन सप्ताह करत. समाप्तीच्या दिवशी तेथेच महाप्रसाद करत.

निवडणूक तळेगांवकर

बॉम्बे कौन्सिलच्या निवडणूकीत कॉंग्रेस पक्षातर्फे नाना कुंटे, वसंत माधव वेदक, लक्ष्मण पाटील व दगडू मालू तळेगांवकर असे ४ उमेदवार उभे होते. त्यावेळी शेतसारा भरणाऱ्यांना किंवा आयकर भरणाऱ्यांना मतदानाचा हक्क होता. तळे येथील प्रचाराचे नेतृत्त्व विनायक गोपाळ पिसाट आणि वामनराव वेदक यांनी केले. चिंतामणशास्त्री जोशी तळे येथे प्रचारासाठी आले होते. हिंदू महासभेतर्फे पेणचे महाजन उभे होते.

खोती

खोती नष्ट करण्याचे आश्वासन कॉंग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यात होते. तथापी बाळ गंगाधर खेर यांच्या मंत्रीमंडळाला खोतांच्या दडपणामुळे निवडणूक आश्वासन पूर्ण करणे शक्य झाले नाही कारण खोत हेच मतदार होते. अलिबाग तालुक्यांतील चरीच्या शेतकरी सत्याग्रहाचे नेतृत्व करणारे नारायण नागूजी पाटील यांनी एक सभा तळयाजवळील रहाटाड येथे घेऊन, खोतीविरूध्द जनजागृती केली.

बॅ. जीनाना, द्विराष्ट्र वादाचा फोलपणा पटविण्याचा गांधीजींनी आटोकाट प्रयत्न केला. परंतू त्यांचा बोलविता धनी इंग्रजच होता. फाळणीकरून असंतोष माजवून हिंदूस्थान सोडावयाचा असे त्यांचे ठरले होते. गांधीजी जोपर्यंत फाळणी विरोधात आहेत तोपर्यंत वाटाघाटीच्या मार्गाने पाकीस्तान मिळणार नाही हे. बॅ. जीनांना माहीत होते. त्यांनी १९४६ च्या मध्यास डायरेक्ट ॲक्शन चा पुकारा केला व पंजाब-बंगालमध्ये हिंदुच्या कत्तली पध्दतशीर घडवून आणल्या, ते

नौखालीचे प्रकरण म्हणून ओळखले जाते. थोडयाच दिवसात ब्रिटिश नौदलाचा संप झाला.

ब्रिटिश कायद्यान्वये १९४५ मध्ये सर्व ग्रामपंचायतीच्या निवडणूका जहिर झाल्या. तळे ग्रामपंचायत स्थापन झाल्यावर प्रौढ मतदान पध्दतीने निवडणूक झाली. जे लोक शेतसारा किंवा घरपट्टी भरतात तेच लोक मतदार होते. जनमत स्वातंत्र्य आंदोलन करणाऱ्या राष्ट्रीय काँग्रेस बरोबर असले तरी निवडणूकीत हिंदु महासभेचे प्रतिनिधी निवडून आल्यामुळे पहिले सरपंच गणपत रिसबूड झाले.

स्वातंत्र मिळण्याची कारणे

दुसऱ्या महायुध्दात इंग्लडची प्रचंड आर्थिक हानी झाल्यामुळे भारतासारख्या अनेक वसाहती टिकविण्याचे सामर्थ्य शिल्लक राहिले नव्हते. अमेरिका व रशिया या महासत्ता वसाहतवादाला प्रतिकूल होत्या. लागोपाठच्या २ महायुध्दांमुळे, ब्रिटिश सैन्याचे पगार, पेन्शन वगैरेंचा भार भारतावर पडला. येथून अधिकाधिक वस्तूंची निर्यात करुन हा भार पेलावा लागला. इंग्लंडची अन्नधान्य वगैरेंची गरजही भारतातून भागविली जाई. युध्दकाळात ब्रिटनमधील अनेक कारखाने नष्ट झाले. पूर्वी इंग्लंडकडे निर्यात होणाऱ्या कच्च्या मालापैकी बराचसा भाग भारतात उभारल्या जाणाऱ्या कारखानदारीकडे वळविला गेला. महायुध्दामुळे भारतातील औद्योगिकीकरणास थोडी चालना मिळाली. प्रबळ होत गेलेल्या इंग्लंडमधील लोकशाही शक्तीच्या आणि जागतिक मताच्या दडपणाखाली त्यांना वसाहती सोडून जाणे भाग पडले. त्यांत भारत हा मुक्त होणारा पहिला देश होय. अहिंसक आंदोलनाने केलेली ही एकमेव क्रांती आहे. सामान्य जनतेने, महात्मा गांधीच्या समर्थ नेतृत्त्वामुळे हे शक्य झाले.

पहिला स्वातंत्र्य दिन

पहिला स्वातंत्र्यदिन सर्व भारतीय या दिवसाची आतुरतेने वाट पाहत होते. देशभर स्वातंत्र्याचा जल्लोष होत होता. शाळेत पटांगणे नव्हती, झेंडा लावण्यासाठी खांब नव्हते परंतु बहुतेकांच्या हातात तिरंगे होते. आज आपण स्वातंत्र्याची फळे चाखतो आहोत. अनेक ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांच्या बलिदानाचे हे फळ आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळणार हे जाहीर झाल्यावर १४ ऑगस्टलाच राष्ट्र सेवादलाचे युवक एकत्र येऊन घरोघर साखर वाटली.

हिंदु महासभेने स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला नसल्याने त्या संस्थेतर्फे निवडून आलेल्या सरपंचाना गावकीने झेंडावंदनाचा मान दिला नाही. गावचे झेंडावंदन १९४२ च्या छोडो भारत आंदोलनात भाग घेऊन शिक्षा भोगलेले प्रभाकर रा. देशमुख यांचे हस्ते व्हावे अशी योजना आखली. रात्रौ १२ वाजता बळीच्या नाक्यावर त्यांच्या हस्ते झेंडावंदन झाल्यावर सर्व तरुण तळेगडावर पोहोचले व सूर्योदया अगोदरच तेथे तिरंगा फडकविला. स्वातंत्र्याची पहाट तळेगडावर आनंदोत्सव करुन साजरी केली.

१५ ऑगस्टला मिरवणूक रथासह काढली होती. त्यांत प्रभाकर देशमुखांची मुलगी चित्रा (सारळकर) हिला भारतमातेच्या पोषाखानी सजविली होती. मिरवणूकीत सर्वांना साखरफुटाणे वाटत होते.

या स्वातंत्र्यसैनिकांना तुरुंगात झाडलोट करणे, कपडे धुणे, जेवण तयार करणे ही सर्व कामे राजकीय कैद्यांना करावी लागत. या त्याग आणि बलिदानामुळे आजचे स्वातंत्र्याचे क्षण आपण अनुभवतो आहोत. आपण हा ऐतिहासिक वारसा जोपासण्याचे काम करणे हे आपले कर्तव्य आहे. स्वराज्याचा हुंकार या मातीतून उमटला त्याचा अभिमान जागविण्यासाठी प्रत्येकाने झटले पाहिजे. ही देशभक्ती आणि विकासाची ज्योत तेवत राहिल आणि ती पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचे काम आपण सर्वांनी केले पाहिजे.

डॉ. श्रीनिवास वेदक